वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ६८१४ /२०२३ दिनांक :- २२/०९/२०२३

-: प्रसिध्दीपत्रक :-

**पाचव्या, सातव्या व नवव्या दिवशी होणारे गणेश विसर्जन ठिकाणांजवळ करण्यात आलेली पार्कींग व्यवस्था**

पुणे शहरात दिनांक- १९.०९.२०२३ ते २८.०९.२०२३ या कालावधीत मोठया प्रमाणात गणेशोत्सव साजरा होत आहे. सदर गणेशोत्सवाचे कालावधीत कित्येक भाविक त्यांचे धार्मिक परंपरेनुसार पाचव्या, सातव्या व नवव्या दिवशी गणेश विसर्जन करीत असतात.चालू वर्षी गणेश उत्सवात दिनांक २३.०९.२०२३ रोजी पाचवा दिवस, दिनांक- २५.०९.२०२३ रोजी सातवा दिवस व दिनांक २७.०९.२०२३ रोजी नववा दिवस येत असून सदर दिवशी प्रामुख्याने खालील ठिकाणी गणेश विसर्जन करण्यात येते. सदर ठिकाणी गणेश विसर्जनादरम्यान वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालावी याकरीता शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन **दि. २३/०९/२०२३, दि. २५/०९/२०२३ व दि. २७/०९/२०२३ रोजी** खालीलप्रमाणे पार्कींग व्यवस्थे बाबत आदेश निर्गमित करीत आहे.

**१. अप्सरा टॉकीज जवळील कॅनॉल (पंडीत जवाहरलाल नेहरू रस्ता)**

- <u>पार्किंग</u>-पंडीत नेहरू रस्त्यावर वाहने अप्सरा टॉकीजचे बाजूस पार्क करावीत.

**२. चिमाजी आप्पा पेशवे पथावरील सावरकर पुतळयाजवळील कॅनॉल (मित्रमंडळ - सावरकर चौक दरम्यान),**

- <u>पार्किंग</u>- चिमाजी आप्पा पेशवे पथावर कॅनॉलचे पुढे मित्रमंडळ चौकापर्यंत पाटील प्लाझाचे डावे बाजूस तसेच सावरकर पुतळा चौकापासून ते पेशवे पार्क या सिंहगड रोडवर सारसबागेचे बाजूस पार्क करावीत.

**३. संगमपूल घाट (आर.टी.ओ. जवळ मोतीलाल रस्त्यावर)**

- <u>पार्किग</u>- संगम पुल येथील राजाबहादुर मिल रोडवर सी.आय.डी. कार्यालय ते आर.टी.ओ. चौक येथे दोन्ही बाजूस भिंतीस लागून पार्क करावीत. तसेच एस.एस.पी.एम.एस. ग्राऊंडचे बाजूसही वाहने पार्क करावीत.

**४. एस.एम.जोशी पुलाखाली (गरवारे कॉलेज मागे),**

- **पार्किंग** -एस.एम.जोशी पुलाजवळ गरवारे कॉलेजच्या मागील बाजूस व ठोसर बागे समोरील स्टेट बँक(वैकुंठ स्मशानभूमी रोड)

**५. बाबा भिडे पुल : दोन्ही बाजुस (डेक्कन पीएमपीएमएल बसस्टॉप जवळ).**

- **पार्किंग**- बाबा भिडे पूल दोन्ही बाजूस नदी पात्रातील मोकळी जागा.

तरी गणेश विसर्जन पाचव्या, सातव्या व नवव्या दिवशी विसर्जनाचे वेळी सोबत आणण्यात येणारी वाहने श्रींची मुर्ती वाहनांवरून उतरून घेतल्यानंतर तात्काळ सदर ठिकाणाहून वाहन हालवुन ते वाहतूकीस अडथळा होणार नाही अशा ठिकाणी रस्ता सोडून अन्यत्र हलवावे.

गणेशोत्सवात वाहतुक कोंडीची समस्या टाळण्यासाठी दिलेल्या सूचनांचे पालन करून पुणे शहर वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे हि विनंती.

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

Scanned with OKEN Scanner